# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः04.08.2025** **वारःसोमवार**

---

1. फिलीपिन्सचे राष्ट्राध्यक्ष फर्डिनांड आर मार्कोस ज्युनियर आजपासून पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर
2. गुजरातमधील कांडला बंदर इथं देशातील पहिला मेक-इन-इंडिया हरित हायड्रोजन प्रकल्प कार्यान्वित
3. पहिला बिमस्टेक पारंपरिक संगीत महोत्सव आजपासून नवी दिल्लीत होणार
4. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची बैठक आजपासून सुरू, रेपोदर कपातीची अपेक्षा आणि
5. अतिवृष्टी आणि प्रतिकूल हवामानामुळं अमरनाथ यात्रा स्थगित

**<u>फिलीपिन्स</u>**

फिलीपिन्सचे राष्ट्राध्यक्ष फर्डिनांड आर मार्कोस ज्युनियर पाच दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी आज दुपारी नवी दिल्लीत दाखल होतील. त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी लुईस अरानेता मार्कोस आणि उच्चस्तरीय शिष्टमंडळ आहे. फिलीपिन्सच्या राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर मार्कोस ज्युनियर यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे. ते उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन विविध मुद्द्यांवर चर्चा करतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांचीही ते भेट घेणार आहेत. फिलीपिन्सला परतण्याआधी मार्कोस बंगळुरूला भेट देणार आहेत. दोन्ही देशांमधील परस्परसंबंध अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने मार्कोस यांची भेट महत्त्वाची मानली जात आहे.

**<u>पंतप्रधान-हरित हायड्रोजन</u>**

गुजरातमधील कांडला बंदर इथं दीनदयाळ बंदर प्राधिकरणानं उभारलेला देशातील पहिला मेक-इन-इंडिया हरित हायड्रोजन प्रकल्प शून्य कार्बन उत्सर्जनाचे उद्दिष्ट गाठण्याच्या प्रयत्नांमध्ये एक महत्त्वाचं पाऊल आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रकल्पाचं कौतुक केलं आहे. अशा सुविधेचं बांधकाम करणारे कांडला हे पहिलं भारतीय बंदर ठरलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मे 2025 मध्ये भुज भेटीदरम्यान 10 मेगावॅट हरित हायड्रोजन सुविधेचा पाया घातल्यानंतर अवघ्या चार महिन्यांतच हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे.

**<u>बिमस्टेक संगीत महोत्सव</u>**

पहिला बिमस्टेक पारंपरिक संगीत महोत्सव आज संध्याकाळी नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं होत असून, परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्या हस्ते त्याचं उद्घाटन होणार आहे. भारत, बांगलादेश, भूतान, म्यानमार, नेपाळ, श्रीलंका आणि थायलंडमधील कलाकार सादरीकरण करतील. भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेनं आयोजित केलेल्या 'सप्तसूर: सात राष्ट्रे, एक मेलडी' महोत्सवात सात बिमस्टेक देशांच्या वैशिष्ट्यपूर्ण संगीत परंपरांचा उत्सव साजरा केला जाईल. हा पहिला संगीत महोत्सव बिमस्टेक सहकार्यातील एक महत्त्वपूर्ण सांस्कृतिक टप्पा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या वर्षी एप्रिलमध्ये थायलंडमध्ये झालेल्या बिमस्टेक शिखर परिषदेत भारतात पहिला बिमस्टेक पारंपरिक संगीत महोत्सव आयोजित करून सांस्कृतिक संबंध मजबूत करण्याची संकल्पना मांडली होती. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे.

**<u>रेल्वेमंत्री</u>**

कोविडनंतर भारतानं आर्थिक आणि तंत्रज्ञान क्षेत्रात चांगली प्रगती केली असून, जगातील चौथी अर्थव्यवस्था ठरली आहे, असं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. गुजरातमधील भावनगर रेल्वे स्थानकात भावनगर ते अयोध्या या साप्ताहिक गाडीला हिरवा झेंडा दाखवल्यानंतर, आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचं काम वेगानं

होत असून लवकरच या दोन शहरातलं अंतर केवळ 2 तास 7 मिनिटांवर येईल असंही त्यांनी सांगितलं भारतीय रेल्वेचं मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत असून, वंदे भारत रेल्वे हे भारतीय रेल्वेच्या अत्याधुनिकीकरणाचं आणि नावीन्यपूर्ण संशोधनाचं उदाहरण असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**<u>आरबीआय</u>**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची बैठक आजपासून सुरू होत आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखालील ही समिती येत्या बुधवारी आपला निर्णय जाहीर करेल. आगामी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर पत पुरवठ्याला चालना देण्यासाठी रेपो दरात पाव टक्का कपात करण्याची शक्यता आहे असं भारतीय स्टेट बँकेनं आपल्या अहवालात म्हटलं आहे. दिवाळीआधी रेपो दरात कपात केल्यास सणासुदीच्या काळात पतपुरवठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचं मागील काळातील आकडेवारीतून दिसून येतं असं या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. मात्र सलग तीन वेळा व्याज दर कमी केल्यामुळे आता रिझर्व्ह बँक व्याज दरात बदल करणार नाही असं मत काही अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे.

**<u>स्मार्टफोन निर्यात</u>**

भारताच्या स्मार्ट फोन निर्यातीनं चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत उच्चांक गाठला आहे. जूनअखेर भारताची स्मार्टफोन निर्यात 772 कोटी डॉलर्सची झाली असून ती गेल्या वर्षी याच काळात झालेल्या निर्यातीपेक्षा 58 टक्क्यांनी जास्त आहे. यात सर्वाधिक वाटा अपल कंपनीच्या उत्पादक कंत्राटदारांचा आहे. 2020 मध्ये सुरू झालेल्या उत्पादन आधारित प्रोत्साहन योजनेमुळे स्थानिक उत्पादकांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळाल्यानं निर्यातीत ही वाढ झाल्याचं मानलं जात आहे.

**<u>गडकरी</u>**

देशात मालवाहतुकीवरचा खर्च पूर्वी 16 टक्के होता. तो चांगल्या रस्त्यांमुळे आता 10 टक्क्यांवर आला आहे आणि भविष्यात तो 9 टक्क्यांवर आणण्याचा आपला प्रयत्न असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल सांगितलं. भारतीय उद्योग महासंघाच्या विदर्भ विभागीय कार्यालयाचं उद्घाटन केल्यानंतर ते काल नागपुरात बोलत होते.

**<u>अवयवदान पंधरवडा</u>**

राष्ट्रीय अवयवदान दिनानिमित्त अवयवदानाबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी महाराष्ट्रात कालपासून अवयवदान पंधरवड्याला प्रारंभ करण्यात आला आहे. यानिमित्त सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागातर्फे 15 ऑगस्टपर्यंत शाळा, महाविद्यालयं, आरोग्यसंस्थांमध्ये चर्चासत्र, कार्यशाळा, सांस्कृतिक कार्यक्रमांसह सायकल फेरी, जनजागृतीपर फेऱ्या आदी विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावणारे डॉक्टर, रुग्णालयं आणि अन्य योगदानकर्त्यांचा उद्या मुंबईत आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे. तर 15 ऑगस्ट रोजी प्रत्येक जिल्ह्यात पालकमंत्र्यांच्या हस्ते अवयवदान करणाऱ्यांच्या कुटुंबाचा सत्कार करण्यात येणार आहे.

**<u>जम्मू काश्मीर</u>**

जम्मू काश्मीरमधल्या कुलगाम जिल्ह्यात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत तीन दहशतवादी ठार झाले आहेत. अद्याप चकमक सुरू असल्याचं लष्करानं म्हटलं आहे. शुक्रवारी रात्री देवसरमधे अखलच्या जंगलात चार ते पाच दहशतवादी लपल्याची माहिती मिळाल्यावर लष्कराच्या नऊ राष्ट्रीय रायफल्सनं जम्मू-काश्मीर पोलीस आणि सीआरपीएफ जवानांसह शोध मोहीम सुरू केली आहे.

**<u>अपघात</u>**

उत्तर प्रदेशात गोंडा इथं काल सकाळी बोलेरो गाडी कालव्यात पडल्यानं झालेल्या अपघातात 11 जणांचा मृत्यू झाला तर चार जण जखमी झाले आहेत. या कालव्यातून 4 जणांना सुखरुप बाहेर काढण्यात आलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केलं असून, मृतांच्या कुटुंबीयांचं सांत्वन केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या अपघातात

झालेल्या जीवितहानीबद्दल दुःख व्यक्त केलं असून, मृतांच्या कुटुंबीयांना राष्ट्रीय मदत निधीतून दोन लाख रुपयांची, तर जखमींना पन्नास हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**अमरनाथ यात्रा**

अतिवृष्टी, प्रतिकूल हवामान आणि खराब रस्त्यांच्या दुरुस्तीचे कठीण काम यामुळं अमरनाथ यात्रा स्थगित करण्यात आली आहे. ही यात्रा 9 ऑगस्ट रोजी समाप्त होणार होती. तीन दिवसांपूर्वी मुसळधार पावसामुळे यात्रा तात्पुरती थांबवण्यात आली होती. मात्र बालताल आणि पहलगाम हे दोन्ही मार्ग सुरक्षित नसल्याने या मार्गांवरून यात्रा पुन्हा सुरू होणार नसल्याचे काल काश्मीरचे विभागीय आयुक्त विजयकुमार बिदुरी यांनी काल एका निवेदनाद्वारे जाहीर केलं. यावर्षी तीन जुलैपासून सुरू झालेल्या या यात्रेत चार लाख 14 हजार भाविकांनी अमरनाथ गुहेचं दर्शन घेतलं आहे.

**क्रीडा**

माजी आशियाई पदक विजेता खेळाडू अब्दुल्ला अबूबाकर यानं कोसानोव्ह मेमोरियल ॲथलेटीक्स स्पर्धेत तिहेरी उडीमध्ये विजेतेपद पटकावलं. कझाकस्तानमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत त्यानं आपल्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा 1 सेंटीमीटर लांब उडी मारुन जेतेपद मिळवलं. या विजयामुळे अबूबाकर सप्टेंबर महिन्यात जपानमध्ये होणाऱ्या जागतिक ॲथलेटीक्स अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्र ठरण्याची शक्यता आहे.

**क्रिकेट**

ओव्हल इथं सुरू असलेल्या अँडरसन तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतील पाचव्या आणि अंतिम सामन्यात काल चौथ्या दिवशी अपुऱ्या दृश्यमानतेमुळं खेळ थांबवण्यात आला तेव्हा इंग्लंडच्या दुसऱ्या डावात सहा गडी बाद 339 धावा झाल्या होत्या. ज्यो रूटनं 105 आणि हॅरी ब्रुकनं 111 धावा केल्या. आज पाचव्या दिवशी सामना जिंकण्यासाठी इंग्लंडला 35 धावांची तर भारताला विजयासाठी चार बळींची आवश्यकता आहे.

**उत्तर प्रदेश**

उत्तर प्रदेशात सततच्या पावसामुळं अनेक नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली असून, 17 जिल्ह्यांमध्ये पूर आला आहे. 402 गावांना पुराचा फटका बसला असून, 84 हजारांहून अधिक लोक प्रभावित झाले आहेत. पुरामुळे आतापर्यंत 343 घरांचं नुकसान झालं आहे, तर 4015 हेक्टरपेक्षा जास्त जमीन पाण्याखाली गेली आहे. पूरग्रस्त भागात बचाव आणि मदत कार्य सुरू आहे, अशी माहिती मदत आयुक्त भानु चंद्र गोस्वामी यांनी दिली. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उत्तर प्रदेशातील पूर परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत, असंही गोस्वामी यांनी सांगितलं.

**हवामान**

अरुणाचल प्रदेश, आसामसह मेघालय, बिहार, हिमाचल प्रदेश, केरळ, पश्चिम बंगाल, तमिळनाडू, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड राज्यात मुसळधार पावसाचा हवामान विभागाचा अंदाज आहे. बिहार, आंध्र प्रदेशची किनारपट्टी, पश्चिम बंगालचा गंगा खोऱ्याचा भाग, जम्मू काश्मीर, लडाख, झारखंड, कर्नाटक आणि मध्य प्रदेशच्या पश्चिम भागात वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.